आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 22/09/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 201 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com


# अनधिकृत केबल्स तात्काळ हटवा,आयुक्तांचा इशारा!

## ओव्हरहेड केबल्सच्या नियमनासाठी प्रस्तावित एसओपी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. त्यामुळे केबल ऑपरेटर्सनी दूरसंचार कायद्यानुसार तसेच महापालिकेच्या नियमांनुसार आवश्यक त्या परवानग्या घेऊनच केबल्स टाकणे गरजेचे आहे. वृक्ष, विद्युत खांब, इमारती, फुटपाथ अथवा इतर अनधिकृत ठिकाणी टाकण्यात आलेल्या केबल्स संबंधित ऑपरेटर्सनी तातडीने हटवाव्यात अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ओव्हरहेड केबल्सचे नियमन तसेच प्रस्तावित मानक कार्यपद्धती (S O P) संदर्भात केबल ऑपरेटर्सच्या प्रतिनिधींसमवेत पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य कुणाल वाव्हळकर, उत्तम केंदळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह शहर अभियंता अनिल भालसाकळे, सह शहर अभियंता महेश कावळे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे उपअभियंता, कर्मचारी तसेच विविध केबल ऑपरेटर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शहरातील केबल व्यवस्थेला अधिक नियोजित, सुरक्षित आणि शिस्तबद्ध स्वरुप देण्यासाठी महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि केबल ऑपरेटर्स यांच्यात समन्वय साधण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ओव्हरहेड केबल्समुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षेच्या समस्या, शहराच्या विद्रुपीकरणाचा प्रश्न, अनधिकृत केबल्सचे नियमन, भूमीगत केबल व्यवस्था आणि त्यासाठी प्रस्तावित मानक कार्यपद्धती याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शहरातील केबल व्यवस्था अधिक सुरक्षित आणि नियोजित करण्यासाठी सर्व केबल ऑपरेटर्सनी भूमीगत केबल व्यवस्थेचा अवलंब करावा. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे भूमीगत केबल्ससाठी सुमारे 610 किलोमीटर लांबीचे पाईप्सचे जाळे उपलब्ध असून, या पायाभूत सुविधेचा वापर करुन केबल ऑपरेटर्सना भूमीगत केबल व्यवस्था उभारण्यासाठी महापालिकेच्या वतीने अल्पदरात सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी सर्व केबल ऑपरेटर्सनी अधिकृतपणे अर्ज करावा. पुढील एक वर्षाच्या कालावधीत शहरातील केबल्स भूमीगत करण्याचे महापालिकेचे लक्ष्य असून, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केबल ऑपरेटर्सचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

तसेच, ज्या केबल्स बंद आहेत किंवा सध्या वापरात नाहीत, अशा केबल्सदेखील तातडीने हटविण्यात याव्यात. अनधिकृत केबल्स स्वतःहून न हटविल्यास महापालिका प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधित केबल्स काढण्यात येतील तसेच आवश्यकतेनुसार त्यांचे कनेक्शन बंद करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिला.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केबल ऑपरेटर्स हे देखील शहराचे नागरिक असून, नागरिकांची सुरक्षितता ही त्यांचीही जबाबदारी आहे, असे सांगितले.

अनधिकृत केबल्समुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून, याबाबत वारंवार सूचना देऊनही अनधिकृत केबल्स न हटविल्यास महापालिका प्रशासनाच्या वतीने नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. संभाव्य नुकसान आणि कारवाई टाळण्यासाठी केबल ऑपरेटर्सनी महापालिकेस सहकार्य करुन अनधिकृत केबल्स हटवाव्यात तसेच अधिकृत परवानगी घेऊनच केबल्स टाकाव्यात, असे आवाहन देखील त्यांनी केले.

# पिंपरी चिंचवडमध्ये 7 दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : ढोल-ताशांचा दणदणाट, पारंपरिक वाद्यांचा निनाद, आरत्यांचे सूर आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात रविवारी (दि. 20) पिंपरी-चिंचवड शहरात सात दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती गणेशभक्तांनी लाडक्या बाप्पाचे भक्तिमय वातावरणात विसर्जन केले. पवना, इंद्रायणी, मुळा नदीघाटांसह विविध तलाव आणि कृत्रिम विसर्जन हौदांवर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.**

सांगवी, चिंचवडगाव, पिंपरी, रावेत, वाल्हेकरवाडी, किवळे, तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगाव, भोसरी, कासारवाडी आणि बोपखेल परिसरात सकाळपासूनच विसर्जनाची लगबग सुरु होती. दुपारनंतर विसर्जन मिरवणुकांना वेग आला. आकर्षक सजावट केलेल्या गणेशमूर्ती, ढोल-ताशा पथके, भजनी मंडळे, पारंपरिक वाद्ये आणि विद्यार्थ्यांच्या झांज पथकांनी मिरवणुकांमध्ये रंगत आणली. ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईने ठेका धरला, तर बाप्पाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विसर्जनस्थळी गणरायाची आरती करून भाविकांनी दर्शन घेतले. 'पुढच्या वर्षी लवकर या' अशी प्रार्थना करत बाप्पाला निरोप देताना अनेक भाविक भावुक झाले होते. विसर्जन घाट, तलाव आणि कृत्रिम हौदांवर महापालिकेकडून आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणूक मार्गांवर तसेच विसर्जनस्थळी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गणेश विसर्जनादरम्यान पर्यावरणपूरक विसर्जनाला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत मूर्ती आणि निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाला भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत तब्बल 5 हजार 60 मूर्ती आणि 14 टन निर्माल्य संकलित करण्यात आले. पिंपरी येथील एच. ए. मैदानावरील कृत्रिम हौदात 115 मूर्ती आणि 150 किलो निर्माल्य जमा झाले. भोसरी येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती केंद्रात 10 मूर्ती आणि 15 किलो निर्माल्य, तर कै. अंकुशराव लांडगे सभागृहातील कृत्रिम हौदावर 474 मूर्ती आणि 750 किलो निर्माल्य संकलित करण्यात आले.



क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील 10 कृत्रिम विसर्जन हौदांवर 2 हजार 150 गणेशमूर्ती जमा करण्यात आल्या. ग क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत 553 मूर्ती आणि 415 किलो निर्माल्य संकलित झाले. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील प्राधिकरण येथील गणेश तलावावर 375 गणेशमूर्ती संकलित करण्यात आल्या.

# पिंपरी-चिंचवडच्या वाढत्या विस्तारासाठी नवे अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी

## ड प्रभागातील केंद्रासाठी जागा तातडीने हस्तांतरित करा; वाहनांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवा – विठ्ठल उर्फ नाना काटे

**>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणात उभी राहत असलेली गृहसंकुले, व्यावसायिक आस्थापना आणि उंच इमारतींची वाढ लक्षात घेता शहरातील अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ड प्रभागांतर्गत नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याच्या कामाला तातडीने गती देण्यात यावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते व नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आहे.**



नवीन अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक असलेली जागा तातडीने हस्तांतरित करून त्यानंतरच्या प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यात याव्यात. केंद्राचे बांधकाम निर्धारित कालावधीत पूर्ण करून ते लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत कार्यान्वित करावे, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे तसेच गृहसंकुल आणि उंच इमारतींची संख्या वाढत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाला जलद प्रतिसाद देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नवीन अग्निशमन केंद्र कार्यान्वित झाल्यास संबंधित परिसरातील नागरिकांना आगीच्या घटना तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितीत अधिक जलद आणि प्रभावी सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असे नाना काटे यांनी म्हटले आहे.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या अग्निशमन केंद्रावरही आवश्यकतेच्या तुलनेत अग्निशमन वाहनांची संख्या वाढविण्याची गरज असल्याचे काटे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. एखाद्या आपत्कालीन घटनेच्या वेळी उपलब्ध वाहन अन्य ठिकाणी पाठविण्यात आल्यास संबंधित केंद्रावर वाहन उपलब्ध नसण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे या केंद्रावर आवश्यक संख्येने अग्निशमन वाहने कायमस्वरूपी उपलब्ध ठेवण्यासाठी योग्य नियोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

केवळ वाहने वाढवून उपयोग होणार नसून, त्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित अग्निशमन केंद्रावर अग्निशमन अधिकारी, जवान आणि इतर आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात यावी, अशी मागणी काटे यांनी केली आहे. उपलब्ध वाहनांचा प्रभावी वापर करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन अग्निशमन केंद्राचे काम तसेच विद्यमान केंद्रांची क्षमता वाढविण्याच्या बाबींकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहावे. वाहन व मनुष्यबळाची कमतरता भासणार नाही, यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करावी आणि नवीन अग्निशमन केंद्राचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

# कौटुंबिक वादातून पत्नीची निर्घृण हत्या; पतीची दुसऱ्या मजल्यावरून उडी

## जमीन खरेदीवरून पती-पत्नीत वाद; आरोपी पती गंभीर जखमी

**>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**देहूरोड : देहूरोड परिसरातील ओंकार सोसायटीमध्ये कौटुंबिक वादातून पत्नीची धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आकाश बारस्कर या आयटी इंजिनिअर पतीने पत्नी शुभांगी बारस्कर (वय 26) हिच्यावर हल्ला करुन तिची हत्या केल्याचा आरोप आहे. त्यानंतर आकाशने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरुन उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेत तो गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, देहूगाव परिसरात गेल्या चार महिन्यांपासून आकाश आणि शुभांगी हे दाम्पत्य भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहत होते. आकाशने आपल्या मूळ गावी जमीन खरेदी केली होती. मात्र, या जमीन खरेदीवरुन शुभांगीचा विरोध असल्याने दोघांमध्ये वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे.

शनिवारी मध्यरात्री याच कारणावरुन पती-पत्नीत जोरदार भांडण झाले. या वादाचे रुपांतर हिंसक घटनेत झाले.

आकाशने घरात असलेल्या धारदार शस्त्राने शुभांगीवर हल्ला केला.

या हल्ल्यात तिचा मृत्यू झाला. पत्नीची हत्या केल्यानंतर आकाशने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरुन उडी घेतली. यात तो गंभीर जखमी झाला.

सोमवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

जखमी आकाशला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान, प्राथमिक तपासात जमीन खरेदीवरुन झालेल्या वादातून ही घटना घडल्याची माहिती समोर येत असली, तरी हत्येमागील नेमके कारण आणि घटनेशी संबंधित इतर बाबींचा देहूरोड पोलीस तपास करत आहेत.



# चाकणमध्ये 1 कोटी 13 लाखांचा गुटखा जप्त

## एफडीएची मोठी कारवाई; गुटखा तस्करांवर मकोका लावण्याचा प्रस्ताव, चालक ताब्यात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चाकण : पुणे जिल्ह्यातील चाकण-तळेगाव चौक परिसरात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई करत तब्बल 1 कोटी 13 लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात आणला जाणारा हा गुटखा भिवंडी आणि ठाण्याच्या दिशेने जात होता. सुमारे सहा तास पाठलाग केल्यानंतर एफडीएच्या पथकाने ट्रक अडवून चालकाला ताब्यात घेतले. या प्रकरणातील आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचा प्रस्ताव एफडीएने पोलिसांकडे पाठविला आहे.**




अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या चार महिन्यांपासून 'सेफ ड्रग, सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत अन्नपदार्थांमधील भेसळ तसेच प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जात आहे.

या मोहिमेचा एक भाग म्हणून 18 सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास एफडीएच्या पथकाने संशयित ट्रकचा माग काढण्यास सुरुवात केली. हा ट्रक मध्य प्रदेशातून समृद्धी महामार्गाने भिवंडी आणि ठाण्याच्या दिशेने जात होता. मात्र, चालकाने नियोजित मार्ग बदलून ट्रक संगमनेरमार्गे पुण्याच्या दिशेने नेला.

चालकाने मार्ग बदलल्याचे लक्षात येताच ठाणे आणि पुणे विभागातील एफडीएची पथके सतर्क झाली. राजगुरुनगर टोलनाक्यावर अधिकाऱ्यांनी ट्रक अडविण्याचा प्रयत्न केला; मात्र चालकाने ट्रक न थांबवता पुढे नेला. त्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने पाठलाग सुरु ठेवण्यात आला. अखेर रात्री आठच्या सुमारास चाकण-तळेगाव चौक परिसरात ट्रक अडविण्यात एफडीएच्या पथकाला यश आले. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये 1 कोटी 13 लाख रुपयांचा गुटखा आढळून आला. हा गुटखा जप्त करून चालकाला ताब्यात घेण्यात आले. संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या कारवाईबाबत प्रतिक्रिया देताना, गुटख्याची अवैध वाहतूक हा केवळ कायद्याचे उल्लंघन करणारा प्रकार नसून सार्वजनिक आरोग्याशी खेळणाऱ्या संघटित गुन्हेगारीचा भाग असल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारांविरोधात प्रशासनाची मोहीम सुरुच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून वाघेश्वर घाट परिसराचे सुशोभीकरण

## टाकाऊ वस्तूंच्या पुनर्वापरातून सार्वजनिक जागेला आकर्षक स्वरूप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : स्वच्छतेची सवय आणि सौंदर्यदृष्टीची जोड मिळाल्यास सार्वजनिक परिसराचे रूप पालटू शकते, याचा प्रत्यय वाघेश्वर घाट परिसरात आला. 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक 3 मधील साठे नगर, चऱ्होली बु. येथील वाघेश्वर घाट परिसरात स्वच्छता आणि सुशोभीकरणाचा उपक्रम राबविण्यात आला.

"सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, स्वच्छता उपक्रमात नागरिकांचा सक्रीय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे.

स्वच्छतेसोबतच उपलब्ध जागांचे सुशोभीकरण आणि टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील पुनर्वापर केल्यास परिसराचा संपूर्ण चेहरामोहरा बदलू शकतो. स्वच्छ, सुंदर पिंपरी चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. स्वच्छता (लक्ष्य क्षेत्रांतर्गत) परिसरातील रस्त्यालगत तसेच सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा आणि अस्वच्छता दूर



करण्यात आली. उपलब्ध सार्वजनिक जागेची स्वच्छता करून तिचे सुशोभीकरण करण्यात आले. नागरिकांनी वापरात नसलेल्या तसेच टाकून दिलेल्या वस्तूंचा पुनर्वापर करून त्यांना रंगरंगोटी करण्यात आली. या वस्तूंचा कलात्मक वापर करून परिसराला आकर्षक स्वरुप देण्यात आले.

"'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयीची जाणीव अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या सवयी नागरिकांनी अंगीकारणे आवश्यक आहे. नागरिक, विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या सहभागातून स्वच्छतेची ही चळवळ अधिक व्यापक होईल," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

स्वच्छतेसोबतच सार्वजनिक जागेच्या सौंदर्यीकरणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमामुळे परिसराचे रुप पालटले. टाकाऊ वस्तूंचाही कल्पकतेने पुनर्वापर करून सार्वजनिक जागा अधिक आकर्षक करता येते, याचा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी नागरिकांना ओला व सुका, सॅनिटरी, विशेष काळजी योग्य कचरा स्वतंत्रपणे संकलित करून महापालिकेच्या घंटागाडीतच देण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच उपस्थित नागरिक, विद्यार्थी आणि शिक्षकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 22/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पुणे फेस्टिव्हल आयोजित बॉक्सिंग स्पर्धेचे निकाल जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**38व्या पुणे फेस्टिव्हल अंतर्गत आयोजित पुरुष आणि महिला बॉक्सिंग स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. या स्पर्धा पुण्यातील भवानी पेठ येथील वस्ताद लहुजी साळवे स्टेडियमवर येथे रंगल्या.**

**संपूर्ण दिवसभर झालेल्या या स्पर्धेत 18 वर्षांखालील विविध 8 वजनगटात 60 मूली आणि 80मुले खेळाडू सहभागी झाले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धा पुणे जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आल्या होत्या.**



### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

1 बेस्ट बॉक्सर पुरस्कार - काव्य जाधव( KLVSP BOXING CLUB )

2.बेस्ट प्रॉमिसिंग बॉक्सर पुरस्कार - अनुष्का राय AK (बॉक्सिंग अकॅडमी वाकड)

3.बेस्ट चॅलेंजर पुरस्कार - वैष्णवी घुले (वीरा मल्टी स्पोर्ट्स अकॅडमी फुरसुंगी)

माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. पुणे फेस्टिव्हलचे क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले हे यावेळी उपस्थित होते.

### मल्लखांब निकाल-

पुणे फेस्टिव्हल अंतर्गत मल्लखांब स्पर्धा महाराष्ट्र मंडळ येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे –

**सर्वात उत्कृष्ट मल्लखांबपट्टू (मुले)**

1.इशान जाधव (सीनियर ग्रुप)

2.श्रीराज जाधव ( जुनियर ग्रुप)

**सर्वात उत्कृष्ट मल्लखांबपट्टू (मुली)**

1. शमीका उभे (सिनियर ग्रुप)

2.श्राव्या रास्ते (जुनियर ग्रुप )

या स्पर्धेचे अभिजीत भोसले आणि सचिन परदेशी समन्वयक होते. प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. पुणे फेस्टिव्हलचे क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले हे यावेळी उपस्थित होते.

### पिकलबॉल - '

पिकलबॉल' स्पर्धेचे मसलबार स्पोर्ट्स क्लब, उंड्री येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत 100हुन अधिक स्त्री - पुरुष स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये बिगनर्स, 35 वर्षावरील आणि इंटरमीडिएट या विभागात स्पर्धा पार पडल्या. पुणे पिकलबॉल असोसिएशनचे खजिनदार अमिराज चौधरी व सचिव कुलदीप रौचंदानी हे समन्वयक होते.

### स्पर्धेचा निकल पुढील प्रमाणे -

अनिकेत शिंदे व अपर्णा चौधरी (विनर इंटरमीडिएट मिक्स्ड डबल्स ) , आरती पांडे व हर्षल लालवानी (रनरप इंटरमीडिएट मिक्स्ड डबल्स)

पुणे फेस्टिव्हलचे क्रीडा समन्वयक प्रसन्न गोखले यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

### छायाचित्रकार स्पर्धा निकाल –

पुणे फेस्टिव्हल आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या तर्फे प्रेस फोटोग्राफरच्या छायाचित्राचे प्रदर्शन व स्पर्धा बालगंधर्व येथे पार पडल्या. त्याचा निकल पुढीलप्रमाणे –

1.प्रथम क्रमांक 10 हजार रुपये - आशिष काळे (महाराष्ट्र टाईम्स)

2.द्वितीय क्रमांक 7 हजार रुपये – कपिल पवार (लोकमत)

3.तृतीय क्रमांक 5 हजार रुपये –अरुल होरायझन (इंडियन एक्सप्रेस)

ज्येष्ठ छायचित्रकर व फेम चित्रपटाचे दिग्दर्शक विक्रम पटवर्धन यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. सकाळ माध्यम समूहाचे संपादक नीलेश खरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यावेळी उपस्थित होते.

# बालगंधर्व रंगमंदिरात आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांना स्वरांजली

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे फेस्टिवलअंतर्गत "व्हॉइस ऑफ पुणे" या सुगम संगीत स्पर्धेचे यंदा 16 वे वर्ष असून, गेल्या पंधरा वर्षांतील प्रथम व द्वितीय क्रमांकाचे विजेते अशा निवडक कलाकारांना एकत्र घेऊन 'आशा सुमन' - अर्थात गानसम्राज्ञी आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांच्या अजरामर गीतांना समर्पित विशेष कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिर येथे रात्री 9 ते 12 या वेळेत सादर करण्यात आला.**




या कार्यक्रमाची संकल्पना ॲड. अनुराधा भारती यांची असून कार्यक्रम समन्वयक नितीन कुलकर्णी यांनी जबाबदारी पार पाडली. प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, टाळ्यांचा कडकडाट आणि एकापेक्षा एक सरस गाण्यांना मिळालेली 'वन्स मोअर'ची दाद. या कार्यक्रमात नितीन कुलकर्णी, उमेश पेडगावकर, अनिल दाभाडे, डॉ. अजय नित्तुरकर, सुब्रसमीर दास, किशोरी तांबोली, प्रीती वाटे, रुपलेखा हेगडे, प्रज्ञा खरात आणि डॉ. रोहिणी काळे यांनी आशा-सुमन यांची गाणी सादर करून रसिकांची मने जिंकली.

वाद्यवृंद - की-बोर्ड: मिहिर भडकमकर आणि रशीद शेख, तबला: रोहित पवार, ऑक्टापॅड: ऋतुराज कोरे.

सादर झालेली गीते: अजहू ना आये बालमा (सुमन कल्याणपूर), तुमसे वो हसीना, ना ना करते प्यार, ये बदलते रिश्ते, गरजता बरसता, तुमने पुकारा, आजकल तेरे मेरे प्यार, दीवाना हुआ बादल, गुनगुना रहे हैं, छोड़ दो आँचल, ये रातें ये मौसम, अभी ना जाओ छोड़ के, पिया पिया पिया, तू तू ही वही, ये लड़का हाय अल्लाह, जीवन के हर मोड़ पर, एक मैं एक और तू, लेकर हम दीवाना दिल, जाने जां, आजा मैं हूँ प्यार तेरा आणि विशेष मेडले - रात बाकी, प्यार करने वाले, जवानी जानेमन, हुस्न के लाखों रंग, ये मेरा दिल, पिया तू अब तो आजा.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968